# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
दूरध्वनी क्र. (022) 2216 39 64 / 65 / 69, फॅक्स क्र. : (022) 2216 39 76
ई-मेल : mercindia@mercindia.org.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in /www.merc.gov.in


जाहिरात क्र. १/२०१३-१४

## जाहीर नोटीस

**विषय : प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१३ बाबत जनतेचे अभिप्राय मागविण्यासाठी नोटीस**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१० प्रसिद्ध करुन त्यावर विविध हितसंबंधितांकडून सूचना / हरकती मागविल्या होत्या.

विविध हितसंबंधितांकडून प्राप्त झालेल्या हरकती / सूचनांच्या आधारे उपरोक्त प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्याचे काम चालू असताना सदर प्रारुप विनियमांमध्ये महत्त्वाचे रचनात्मक बदल करणे आवश्यक असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे, सुधारित प्रारुप कृतीच्या मानकांच्या विनियमांवर, म्हणजेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१३ वर पुन्हा एकदा सूचना / हरकती मागविणे आयोगास योग्य वाटते.

आयोगाच्या **www.mercindia.org.in / www.merc.gov.in** या संकेतस्थळांवर सदर प्रारुप विनियमांची प्रत उतरवून घेण्याजोग्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग येथे वरील प्रारुपावर जनता, वितरण परवानाधारक आणि अन्य हितसंबंधितांकडून लेखी सूचना आणि / किंवा हरकती मागवित आहे. या सूचना / हरकती (१ + ५ प्रतींमध्ये), सचिव, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ येथे व्यक्तिशः किंवा फॅक्सने किंवा ई-मेलद्वारा **sop2013@merc.gov.in** या पत्त्यावर दि. २४ एप्रिल २०१३ या दिवशी किंवा त्यापूर्वी मिळतील, अशा रीतीने पाठविण्यात याव्यात.

दि. २४ एप्रिल २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

स्वाक्षरी/-
**(कुलदीप ना. खवारे)**
सचिव, मविनिआ

मुंबई
दिनांक : १ एप्रिल २०१३

**Size : 10 (H) x 15 (H) = 150 SQC**